तेन व्यक्तेन भुंजिथा

# डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

एम. एम. पटेल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित

अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, हॉस्पिटल व संशोधन केंद्र, कुंभारी

अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा

## प्रमाणपत्र

श्री./कु./सौ./श्रीमती डॉ. अभिजित जगताप (वैद्यकीय अधिकारी सोलापूर विद्यापीठ)

**जागतिक अवयवदान २०१८ दिनानिमित्त** आयोजित केलेल्या शोभा यात्रेत (रॅलीत) सहभागी झाल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| डॉ. सुनिल घाटे | प्रा.डॉ. सौ. नभा काकडे | डॉ. आर.डी. जयकर | डॉ. माधवी रायते |
|---|---|---|---|
| अधिष्ठाता | अध्यक्षा | प्राध्यापक व विभाग प्रमुख | अधिष्ठाता |
| डॉ.वै.स्मृ. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर | एफ. पी. ए. आय., सोलापूर | सर्जरी को-ऑर्डीनेटर | अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, कुंभारी |

लोकमत

श्रीकांत आणेकर: अवयवदान महाअभियानाचा शुभारंभ; शहरातून रॅली

# अवयवदानासाठी पुढाकार हवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर:** वयवदान हे सामाजिक कार्य आहे. प्रत्येक गरजू रुग्णांना अवयव मिळायला पाहिजे. अवयवदानाच्या प्रक्रियेचा जनमाणसामध्ये व्यापक स्वरुपात प्रसार होण्याची गरज आहे. दुर्दैवाने मेंदूमृत रुग्णांच्या अवयव प्रत्यारोपणासंबंधी समुपदेशन, रॅली यासारख्या माध्यमातून जागृती वाढवण्याचे समाजातील प्रत्येक घटकाने क्रियाशील व्हावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीकांत आणेकर यांनी केले.




छायाचित्रात रॅलीला हिरवा झेंडा दाखवताना प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीकांत आणेकर, डॉ. पी. आर. कुलकर्णी, डॉ. ऋत्विक जयकर, अशोक लांबतुरे, डॉ.संदीप होळकर आदी.

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र, अश्विनी सहकारी रुग्णालय, संशोधन केंद्र आणि फॅमिली प्लॅनिंग असो. ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने अवयवदान महाअभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. डॉ. वैशंपायन महाविद्यालयाच्या प्रांगणात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमास वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. पी. आर. कुलकर्णी, फॅमिली प्लॅनिंगचे डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. एन. बी. तेली, किडनी विकार तज्ज्ञ डॉ.संदीप होळकर, डॉ. किरण जोशी, चंदुभाई देढिया, अश्विनी रुग्णालयाचे संचालक अशोक लांबतुरे, प्रशासकीय अधिकारी विश्वनाथ मेरकर, सोलापूर विद्यापीठ रासेयोचे समन्वयक प्रा. श्रीमंत धोकटे आदी मान्यवर उपस्थित होते. किडनी, त्वचा, डोळे, यकृत, फुफ्फुस यासारखे अवयव आपण दान करु शकतो. आपण सर्वांनी आजच्या दिवशी अवयवदानाचा संकल्प करुन अर्ज भरावा, असे आवाहन उपस्थितांनी केले. यावेळी अवयवदान केलेल्या कुटुंबांचा सन्मान करण्यात आला. सिद्राम बिज्जरगी व सविता धडके यांचा प्रमुख न्यायाधीशांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ऋत्विक जयकर यांनी तर सूत्रसंचालन अशोक लांबतुरे यांनी तर रॅलीचे आभार डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी मानले.

रॅली यशस्वी करण्यासाठी जनसंपर्क अधिकारी दत्ता शिंदे, स्वरुपा कवलगी, शिवराज सरवदे, अवधुत कुलकर्णी, मनोज परदेशी, सूर्यकांत कवलगी, नागराज दंतकाळे, नीलकंठ चौगुले, दत्तात्रय यलपले यांनी परिश्रम घेतले.

## प्रबोधनात्मक पथनाट्याचा समावेश...

◆ रॅलीमध्ये अश्विनी नर्सिंग कॉलेज, कुंभारी यांचा चित्ररथ सहभागी झाला होता. नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी अवयवदानाचे महत्त्व पटवून देणारे पथनाट्य सादर करुन शहरवासियांना प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

## हवेत फुगे सोडून शुभारंभ...

◆ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणातून अवयवदान रॅलीचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आला. ही रॅली शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पोटफाडी चौक, सिद्धार्थ सोसायटी, बापूजी नगर मार्गे मौलाली चौक, जगदंबा चौक, सात रस्ता, रोटरी बाग, भगतसिंग मार्केट येथून अश्विनी रुग्णालयात समारोप करण्यात आला. रॅलीमध्ये वालचंद महाविद्यालय, कमलाबेन पटेल नर्सिंग कॉलेज, धनराज गिरजी स्कूल, आयुर्वेदिक कॉलेज, डीबीएफ दयानंद कॉलेज, सोलापूर विद्यापीठ, सिव्हिल हॉस्पिटल, संगमेश्वर महाविद्यालय, देहांगदान जीवनदान सामाजिक संस्था अशा विविध सामाजिक, शिक्षणसंस्थांनी सहभाग नोंदवला.

Hello Solapur
Page No. 3 Aug 14, 2018
Powered by: erelego.com


FPA


कॉमर्स कॉलेज, सोलापूर.
राष्ट्रीय सेवा योजना
स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
अवयवदान श्रेष्ठदान
पुष्पलता चव्हाण
शिवपार्थ कोळी


डॉ.व्हि.एम.मेडिकल कॉलेज, सोलापूर
अवयवदान श्रेष्ठदान
Dr. V.M.Govt. Medical College, Solapur
Gift Of Life, Be a Organ Donor
Dr. V.M.Govt. Medical College, Solapur
Be a Organ Donor, Be a Hero
One Organ Do
Can Save 9 Lives
डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर
अवयवदान श्रेष्ठदान
अवयवदाता
ओंकार महिंद्रकर
अवयवदाता
पुष्पलता चव्हाण
अवयवदाता
शिवपार्थ कोळी
अवयवदाता
किरण लोभे


इंडियन मेडिकल असोसिएशन, सोलापूर
आणि
देहांगदान जीवनदान समाजसेवी संस्था, सोलापूर
अवयवदान- समज आणि गैरसमज चर्चासत्र